

# बेडूक आणि खजिना

मॅक्स वेल्थुइज

मराठी: अश्विनी बर्वे



# बेडूक आणि खजिना



मॅक्स वेल्थुइज

मराठी: अश्विनी बर्वे




"छोट्या अस्वला, आपण लवकर आपला नाश्ता संपवूया," बेडूक म्हणालं.
"आज आपण खजिना शोधायला जाणार आहोत!"
"खजिना शोधायचा? छोटं अस्वल म्हणाले.म्हणजे काय करायचं??"
"माझ्याबरोबर ये मग तुला कळेल," बेडूक म्हणालं.



"आपण एक खोल खड्डा खणणार आहोत," त्याने समजावून सांगितले. "जोपर्यंत आपल्याला खजिना सापडत नाही, तोपर्यंत आपण खणतच राहणार आहोत."
"पण तिथे खजिनाच नसेल तर काय?"छोट्या अस्वलाने विचारले.
"खजिना नेहमीच असतो," बेडूक म्हणालं.
"मी खात्री देतो."



एकाएकी, बेडूक थांबले आणि त्याने जमिनीकडे बोट दाखवले.
"आपल्याला खजिना इथेच मिळेल," ते म्हणाले. "अगदी इथेच!"
"तुला कसं कळलं?" छोटया अस्वलाने विचारलं.
"मला माहीत आहे," बेडूक म्हणालं.





बेडूक खणायला लागले. छोटे अस्वल कौतुकाने पाहत होते. ते खूप कष्टाचे काम दिसत होते.
थोड्याच वेळात बेडूक थकले. "आता तुझी पाळी आहे," ते छोट्या अस्वलाला म्हणाले.
छोट्या अस्वलाला खात्री नव्हती, पण त्याने फावडे घेतले.

...आणि त्याने धैर्याने खोदायला सुरुवात केली. पण फावडे त्याच्यासाठी खूपच मोठे  आणि प्रचंड जड होते.
“हे निरुपयोगी आहे,” थोड्या वेळाने बेडूक म्हणाले. “या गतीने आपल्याला खजिना कधीच सापडणार नाही. ते मला परत दे.”





म्हणून छोटे अस्वल बघत राहिले, बेडूक अधिकाधिक खोल खणत गेला - इतका की तो दिसेनासा झाला.
"बेडका!" छोटे अस्वल ओरडले. "खजिना सापडला का?"


"नाही, अजून नाही..." खूप खालून बेडकाचा आवाज आला.
"लक्ष ठेव, छोट्या अस्वला, इकडे एक दगड येतोय..."
पण छोट्या अस्वलाला ऐकू येत नव्हते. तो खड्ड्यात वाकला, आणि...



तो आत पडला! ते त्या खोल, अंधाऱ्या खड्ड्यात बसले होते.
"मला भूक लागली आहे," छोटे अस्वल म्हणाले. "मला घरी जायचे आहे."
"आपण हे करू शकत नाही," बेडूक शांतपणे म्हणाला. "हा खड्डा खूप खोल आहे."
आपण बाहेर पडू शकत नाही. आपण अडकलो आहोत.
छोटे अस्वल रडू लागले. "आपण इथे कायमचेच राहणार आहोत का!"
त्याने हुंदके देत विचारले.



मी उंदरासोबत पुन्हा कधीच मासेमारीला जाणार नाही
आणि सशाला ला माझी खूप आठवण येईल!
बेडूकसुद्धा घाबरले होते. छोट्या अस्वलाला कसा धीर
द्यावा हे त्याला कळत नव्हते. "हिंमत ठेव, छोट्या
अस्वला," तो म्हणाला. "आपण मदतीसाठी ओरडूया.
कोणीतरी नक्कीच ऐकेल." म्हणून, त्यांनी खूप हाका
मारल्या - पण कोणीच आले नाही.



मग बेडकाला दुसरी कल्पना सुचली. "चल गाऊया," तो म्हणाला. "आपला मूड चांगला करण्यासाठी आपण बिळात बसून एखादे गाणे गाऊया. “चंद्र उगवला, रात्र झाली.


बेडूक आणि छोटे अस्वल गातच राहिले, इतके की आपल्या उबदार, लहानशा बिछान्यापासून दूर असूनही, ते इतके थकले की अखेरीस झोपी गेले...




दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर, बदक फिरायला बाहेर पडले, तेव्हा त्याला वाळूचा एक डोंगर दिसला. "किती विलक्षण!" ते म्हणाले. "हे काल इथे नव्हतं!" मग त्याला तो खड्डा दिसला. आणि ते डुकराला शोधायला गेलं.



डुक्कर पुढे वाकलं आणि खड्ड्यात खाली आवाज दिला, "हॅलो? कोणी आहे का तिकडे?"
"हो, आम्हीच आहोत!" बेडूक आणि छोटे अस्वल एकत्र ओरडले. "आम्हीच आहोत. बेडूक आणि छोटे अस्वल! आम्ही बाहेर पडू शकत नाही!"
"मला वाटतं आपण जाऊन उंदराला आणायला पाहिजे," डुक्कर म्हणाले.



बदक मोठ्याने ओरडत घाईघाईने निघून गेले.
"उंदरा! उंदरा! लवकर ये! बेडूक आणि छोटे अस्वल एका बिळात अडकले आहेत आणि ते बाहेर पडू शकत नाहीत!"



उंदराला नेमकं काय करायचं ते माहीत होतं. त्याने गोठ्यातून एक शिडी आणली आणि तो व बदक घाईघाईने त्या अपघाताच्या ठिकाणी पोहोचले.





उंदराने शिडी खड्ड्यात खाली सोडली, तो खड्डा इतका खोल होता की लवकरच शिडी दिसेनाशी झाली.
"वर चढ, छोट्या अस्वला!" प्राणी ओरडले. "आणि बेडका, तू त्याच्या मागे यायलाच हवं! घाबरू नकोस. आम्ही तुला मदत करू!"

छोटे अस्वल काळजीपूर्वक चढू लागले.
जेव्हा ते खड्ड्याच्या काठाजवळ पोहोचले,
तेव्हा त्याच्या मित्रांनी त्याला सुरक्षित बाहेर ओढले.
मग बेडकाची पाळी होती....





जेव्हा फबेडूक जमिनीवर आले तेव्हा सर्वांनी जल्लोष केला. उंदराने त्यांना बिळातून बाहेर काढायला मदत केली, तेव्हा ते "हुर्रे!" असे ओरडले.
"पण तू तिथे खाली काय करत होतास?" सशाने काळजीने विचारले. "एवढा खोल खड्डा अत्यंत धोकादायक असतो."

आपल्याला तो ताबडतोब बुजवावा लागेल.
"ही माझी चूक होती," बेडूक शांतपणे म्हणाला. "मी छोट्या अस्वलाला वचन दिलं होतं की आपल्याला खजिना सापडेल, पण तिथे काहीच नव्हतं. आता तिथे फक्त एक मोठं, निरुपयोगी खड्डा आहे आणि हा सगळा माझा दोष आहे."
बेडूक खूप निराश झालं होतं.



"अरे, पण तुम्हाला खजिना सापडलाच आहे,"
उंदीर गंभीरपणे म्हणाला आणि खाली गुडघे टेकून
जवळच पडलेला दगड उचलला.
"हा दगड शंभर दशलक्ष वर्षांपेक्षाही जुना आहे!"

त्याने आपल्या बाहीवर दगड चमकेपर्यंत घासला.
मग त्याने तो बेडकाला दिला.
बेडकाला आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसत
नव्हता. तो आनंदाने खुलला होता.



"धन्यवाद, उंदरा," तो प्रेमाने म्हणाला. "पण मला वाटतं हा छोट्या अस्वलाचा खजिना आहे. मी तो त्याला देईन - कारण तो खूप शूर होता, आणि मी त्याला वचन दिलं होतं!"

समाप्त